२१ जुलै १९६९: नील आर्मस्टाँगने चंद्रावर पाऊल ठेवले आणि माणसाच्या प्रगतीचा झेंडा अंतराळात पोचला.
मी तेव्हा फारच लहान होतो तरी पण पेपरमध्ये आलेल्या ठळक बातम्या आणि रेडियोला कान लावून आतुरतेने बातम्या ऐकत असलेल्या माझ्या आजोबांचे चित्र अजून माझ्या डोळयासमोर आहे.
माझे नाव नील आर्मस्ट्राँग ठेवले असतेस तर मीसुध्दा चन्द्रावर गेलो असतो असा वाद मी माझ्या आईशी घातला होता अशी "स्टोरी" मला अनेक वेळा ऐकविण्यात आली आहे त्यामुळे ती खरी असावी आणि माझं नाव मन्दार असल्यामुळेच अजून मला अंतराळप्रवासाची संधी मिळाली नाही याविषयी आता माझी खात्री पटली आहे.
मला स्वतःला मात्र गेल्या वर्षी २२ ऑक्टोबरला भारतीय चंद्रयान यशस्वी झालं तेव्हा जास्त आनन्द झाला.

आता अनेक देशांचा अंतराळ कार्यक्रम जोरात सुरू आहे. Space shuttle launch ही अगदी नित्याची बाब झाली आहे.

गेल्या ५०० वर्षात माणसाने केलेली प्रगती अपरंपार आहे पण खरंच ही प्रगती आहे की (काही बाबतीत तरी) अधोगती याचा विचार करायची वेळ आली आहे.

"progress means enhanced control on external environment" ही एका विचारवन्ताने केलेली प्रगतीची व्याख्या. ती माझ्या मनाला पटते म्हणून मी ती प्रमाण मानतो. आज बाह्य जगावर नियंत्रण मिळविण्याच्या अट्टाहासापायी आपण जैविकसृष्टीतील कित्येक गोष्टींचा ऱ्हास करत सुटलो आहोत.

चंद्रावरच्या पहिल्या मोहिमेनन्तर १९६९ मध्ये सदानंद रेगे याच्यासारख्या प्रतिभावंत नवकवीला काय वाटलं हे त्याच्याच शब्दात वाचायला तुम्हाला खूप मजा येईल.
वेडया कविता ह्या त्यांच्या संग्रहातील या काही चंद्रकविता.

*चंद्रकविता*
*(सलाम चंद्रावरच्या पहिल्या माणसाला)*

**आणि**

आणि ईश्वर म्हणालाः
आता मी चंद्र घडवितो
आणि ईश्वराने चंद्र घडविला

आणि ईश्वराने घडविलेला चंद्र
ईश्वरानेच घटविलेल्या आकाशात
ईश्वरानेच पेटवलेल्या हंसासारखा
डुंबू लागला

आणि माणसाच्या डोळयात आभाळ होतं
त्यात त्या डुंबण्याचं बिंब पडलं
बिंब पडलं
अन् चिंब दाढी तिंबणारा माणूस
श्वापदासारखा हसला.

आणि ईश्वर आता
काहीच म्हणेनासा झाला.

माणूसही होता त्यानंच केला....

## संभाळ

*तो म्हणतोय्ः*
That’s one small step for man
*हो, हो, तुला उद्देशून म्हणतोय्…*
*खिशात आहे त्याच्या संदेश*
*शांततेचा….*
We came in peace for all mankind
*तोही तुझ्यासाठीच.*
*आम्ही असले संदेश*
*संडासात ठेवतो*
*टॉयलेट पेपर म्हणून…*
*घाबरू नकोस असा.*

*पण एकच कर*
*यापुढे संभाळून रहा.*
*जिवाला जप.*
*यापुढचं तुझं ग्रहण कधीच न सुटणारं असणाररराय्….*
*आता राहूकेतू वारले.*
*आता जन्माला येतोय त्यांचा बाप…*
*म्हणून म्हटलं :*
*आपला संभाळून रहा….*

## लहान मुलांच्या पुस्तकातली गोष्ट

*चंद्र पडला होता पाण्यात.*
*मग माकडांनी केली साखळी लांबच लांब.*
*एकानं घेतलं उलटं टांगून फांदीला*

नि दुसऱ्याचं शेपूट धरलं.
दुसऱ्यानं तिसऱ्याचं... तिसऱ्यानं चौथ्याचं...
अखेर वरात आली चंद्राच्या दाराशी.
शेवटच्या माकडानं नववधूचं घुंगट...
पण तेवढयात काहीतरी झालं.

पाण्याला तडा गेला.

चंद्र हसत होता आकाशात.

पण या खेपेला काही वेगळंच होतं.
या खेपेला शेपटया नव्हत्या माकडांना.
या खेपेला पुसटसासुद्धा नव्हता
तडा गेला पाण्याला....

चंद्र होता थरथर कापत
शेपूट नसलेल्या माकडांची शप्पत.

## ते मुंबईला आले

ते मुंबईला आले
तेव्हा नातवाचं बेट धरून
मी केव्हाचा गर्दीत उभा होतो
नातवाने मला कागदाचा रंगीत बावटा घेऊन दिला होता
तो हातात धरून मी फडफडवीत होतो.
नातू मला सगळं काही सांगत होता.
गागारिन, शेपर्ड, ग्रीसन, तिनोव्ह....
ग्लेन, कार्पेंटर, निकोल्येव्ह, पोपोविच...
कूपर, बिकोव्हस्की,व्हॅलेंटिना तेरेश्कोव्हा...

सारखा त्याचा पट्टा चालूच होता....
मान मोडलेल्या भावलीसारखा मी हो हो करीत होतो.

अखेर ते आले...ते आले...
नातू म्हणालाः पहा...ते...ते आले...
तो मधला नील्, इकडला कॉलिन्स् अन् तो...

मी डोळे मिटले
नि म्हटलं : दत्तात्रेया!!!

**चंद्रा, मित्रा...**

चंद्रा, मित्रा,
मुळीसुद्धा नकोस लावून घेऊ मनास
जे काही चाललंय ते.
हे असंच आलंय चालत
विश्वाच्या आरंभापासून
अगदी पहिल्या अणूच्या पोटात
ज्याक्षणी गुरगुरायला लागलं
तेव्हापासूनच हे होऊन बसलं होतं अटळ
आता नाही यातनं पळ.
आता नुसतं पहात रहायचं. गंमत. नाटक.

जरा ओरखडे उठतील तुझ्या अंगावर चार
पण हळद-तुरटी लावली
की पुन्हा लख्ख पौर्णिमा...
एकदाचं होऊन जाऊ द्या व्हायचंय ते...
हां, पण एक बरीक विसरू नकोस
या सगळया धबडग्यात...

खिडकीसमोरचं ते निंबोणीचं झाड
अन् तिथली तुझी ती लपायची जागा...
हे तू विसरलास
की खेळ खलासच झाला की सारा.
अणूच्या पोटात होतंय ते केवळ किरकोळ आहे.

**कुणा एके काळची नाट्यछटा**

अग, बॅग भरलीस का माझी?
तुला काल सांगितलं होतं न्
शुक्रवारी मिटींग आहे बोर्डाची
ट्रॅंक्विलिटी बेसवर म्हणून...?
हे पापड, लोणचं कशाला हवंय?
तुम्हा इंडियन बायकांना अकला
कधी येणरायत् कोण जाणे
मी का कुठं लंडन-अमेरिकेला जातोय?

सदानंद रेगे
(वेडया कविता)

ह्या कविता अंतर्मुख करायला लावतात.

माझ्या मनात यानिमित्ताने आलेल्या विचारांवर तुमची मते जाणून घ्यायला मला जरूर आवडेल.

- केनेडीनी जेव्हा 1961 मध्ये अमेरिकेच्या अंतराळ मोहिमेची घोषणा केली तेव्हा त्यांना माणसाला चंद्रावर पाठवायचे आणि सुखरूप परत आणायचे याकरता काय करावे लागेल याची अजिबात कल्पना नव्हती. परंतु हा उद्देश जाहीर केल्यावर तो अमेरिकेच्या जनतेच्या इभ्रतीचा प्रश्न बनला

आणि संपूर्ण देश या उद्दिष्टपूर्तीच्या मागे एकजुटीने उभा राहिला.
शास्त्रीजींनी 1965 मध्ये लोकांना आठवडयात एक वेळ जेवण सोडण्याची विनन्ती केली आणि हजारो लोकांनी तो आदेश मानला आणि आयुष्यभर पाळला. केनेडी किंवा शास्त्रीजींनी सांगितले आणि सगळया देशाने झोकून दिले **हा केवळ करिष्मा की नेतृत्वावरची दृढ निष्ठा?**

अशी इच्छा त्यानंतर कुठल्याच समस्येच्या बाबतीत कुठल्याही राजकारण्याने का दाखविली नाही? आज आपल्याला आरोग्य, पर्यावरण, अर्थकारण या सर्वच क्षेत्रात एवढया समस्या भेडसावतायत पण **त्या सोडवण्यासाठी असलेली सामाजिक अथवा राजकीय इच्छाशक्ती कमी पडते आहे का? की व्यक्तिकेन्द्रित समाजव्यवस्थेचा हा परिपाक आहे?**

- पीट कॉनराड कोण होता हे आठवतं का? असं विचारलं त्र आपल्यापैकी बहुतेकांचं उत्तरः नाही असं असेल. पीट हा चंद्रावर भ्रमण केलेला तिसरा अंतराळवीर. अपोलो 12 चा कमांडर. पीटने नंतर अंतराळक्षेत्रात प्रचंड काम केले. स्कायलॅब, स्पेस स्टेशन च्या उभारणीत त्याचा मोठा सहभाग होता. तो केवळ No. 3 होता म्हणून तो विस्मरणात गेला की काय?
  आर्मस्टॉंग आणि आल्डिन चंद्रावर भ्रमण करत असताना, अपोलो 11 चे संचालक कॉलिन्स होता. त्याच्याविषयी फारसे काही लिहीलं गेलेलं नाही. I was never there असं लिहीलेलं त्याचं पुस्तक फार प्रसिध्द आहे. कॉलिन्सने नन्तर NASA च्या विविध प्रकल्पांमध्ये खूप मोठया भूमिका निभावल्या. Smithsonian museum च्या Air & Space museum चा

तो संस्थापक सल्लागार होता. त्याला अमेरिकेतील अनेक क्षेत्रातील सर्वोच्च बहुमान मिळाले. पण तरीही अंतराळवीर म्हटले की त्याचे नाव डोळयासमोर येत नाही. **कुठल्याही बाबतीत पहिला नंबर नसेल तर यश झाकोळून जातं का?**

- अंतराळातून किंवा चंद्रावरुन पृथ्वी अतिशय सुन्दर दिसते असं सगळया अंतराळवीरांनी लिहिले आहे. पृथ्वीचं सौंदर्य जाणवायला एवढं लांब जावं लागतं का? चंद्रमोहिमेचा उद्‌देश विश्व पादाक्रांत करण्याचा होता. पण सगळया अंतराळवीरांना जाणवलेली पहिली गोष्ट म्हणजेः पृथ्वीवरचे कुठलेही भेद देश, धर्म, जाती चंद्रावरुन जाणवत नाहीत. अंतराळभ्रमण ही जागतिकीकरणाची (globalisation) नान्दी होती असं म्हणूनच म्हटलं जातं.

**मन्दार**